HELLO लोकमत

, रविवार, दि.३ ऑक्टोबर २०१०

# एड्‌सबाधित अनाथ बालकांना आज विविध वस्तूंचे वितरण

परभणी, दि.२ (प्रतिनिधी)- येथील होमिओपॅथीक अकादमी ऑफ रिसर्च ॲण्ड चॅरीटीज्‌ या संस्थेच्या वतीने एड्‌सबाधित मुलांसाठी दैनंदिन वापरासाठी असणाऱ्या विविध वस्तूंचे ३ ऑक्टोबर रोजी वितरण केले जाणार आहे. कबडी मंडईतील जीवनेरखा बालगृह येथे हा कार्यक्रम होईल.

होमिओपॅथी अकादमी ऑफ रिसर्च ॲण्ड चॅरीटीज्‌ या संस्थेच्या वतीने जीवनेरखा बालगृहातील एड्‌सबाधित अनाथ मुलांना मदत मिळावी या उद्देशाने 'प्रतिसाद' या चित्रपटाचे आयोजन केले होते. या चित्रपटाच्या माध्यमातून जी देणगी जमा झाली. त्यातून या अनाथ मुलांना उपयोगी पडणाऱ्या वस्तू, कॉटस्‌, पोषण आहार, कपडे, ब्लँकेट, चादर, डेटॉल, शैक्षणिक उपयोगाच्या वस्तू पुस्तके, चार्ट, औषधांची प्रथमोपचार पेटी आदी वस्तूंचे देणगी स्वरुपात वितरण केले जाणार आहे. होमिओपॅथीक अकादमीच्या माध्यमातून मुलांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. ॲड. अशोक सोनी, ॲड. ए. एल. शेळके, ॲड. एम. के. उबाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होईल. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. पवन चांडक, डॉ. गोपाळ दरक, अंबादास आकूलवाड, विशाल तोष्णीवाल, राहुल पतंगे आदींनी केले आहे.